नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८३/२०१३

**नि. १०४ खालील आदेश**

अर्ज व त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे वाचले. वादींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एम्.आय. सय्यद व प्रतिवादी यांचे विद्वान विधिज्ञ श्री. आर.एस्.बावंकर यांचा युक्तीवाद ऐकला. सदरील अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरूस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादींचे अर्जातील कथन की, त्यांना दाव्यातील परिच्छेद क्र. २ च्या शेवटी 'प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे पूर्वाधिकारी याचे नांवे दिनांक १६/०४/१९९३ रोजी नोटरी एम्.एस्. गायतोंडे यांचेसमक्ष कुलअखत्यारपत्र करून दिले होते व दिनांक ०५/१२/१९९१ रोजी स्पेशल मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट, मुंबई यांचेसमक्ष हक्कसोडपत्र करून दिले होते व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे पूर्वाधिका—यांनी ते वादी क्र. २ यांचे ताब्यात दिले होते' असा मजकूर नमुद करावयाचा आहे. सदरची दुरूस्ती ही औपचारीक स्वरूपाची दुरूस्ती आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून अर्जाला सक्त हरकत घेतली असुन अर्ज मुदतीत नसल्यामुळे व ज्या कागदांच्या आधारावर वादी दुरूस्ती मागत आहे ती कागदपत्रे पुराव्यात वाचण्यात येतील. तसेच वादींनी यापूर्वीही दुरूस्ती मागितलेली असल्यामुळे त्यावेळी सदरची दुरूस्ती करणे आवश्यक होते. त्यामुळे आता सदरची दुरूस्ती मागता येणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

३. वादींनी सदरचा दावा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याविरूध्द त्यांचे पूर्वाधिकारी म्हणजेच त्यांची आई राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर यांनी केलेल्या दिनांक ०६/०४/१९९१ रोजीचे कराराची पूर्तता करून दावा मिळकतीचे खरेदीखत करून मिळण्यासाठी व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. सदरील दाव्यातील वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची आई श्रीमती राधाबाई आत्माराम सोनुर्लेकर हिने दावा मिळकतीची विक्री करण्यासाठी सदरचा करार करून दिला होता. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर करार करण्यासाठी त्यांचे पूर्वाधिकारी यांना हक्कसोडपत्र करून दिले होते व ते हक्कसोडपत्र वादींच्या ताब्यात दिले होते. वादी सदरील अर्जाने त्याबाबतचा मजकूर दाव्यात समाविष्ट करू इच्छीत आहे. वादी मागणी करीत असलेले हक्कसोडपत्र व कुलअखत्यारपत्र हे दाव्यात महत्वाचे दस्त आहेत. या दस्ताबाबत वादींना दाव्यात पुरावा देण्याची संधी नाकारली तर वादींना त्यांची बाजु व्यवस्थित मांडता येणार नाही असे दिसते.

४. सदरील दावा हा वादींच्या उलटतपासासाठी प्रलंबित असतांना वादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. दावा पाच वर्षाहून अधिक जुना असून वादींनी सदरचा अर्ज विलंबाने दिलेला आहे. परंतु दाव्यात वादीचा उलटतपास झालेला नसल्यामुळे प्रतिवादी यांना सदरील दुरूस्ती बाबत वादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे केवळ वादींनी उशीराने अर्ज दिला म्हणून अर्ज नामंजूर करणे न्यायोचित दिसून येत नाही. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होईल असे दिसून येत नाही.

५. सबब वरील बाबींचा विचार करता अर्ज मंजूर होण्यास पात्र दिसतो. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी प्रतिवादींना खर्च म्हणून रूपये १०००/— (रूपये एक हजार मात्र) व शासनाला खर्च म्हणून रूपये ५००/— (रूपये पाचशे मात्र) दयावे.

३. वादींनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर सहाय्यक अधिक्षक (वित्त) यांनी ती सरकार भरणा करावी.

४. वादींनी १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरूस्ती करून दावा दुरूस्त प्रत दाव्यात सामील करावी.

**सही/—**
(एम्. एस्. बुधवंत)
दिनांक :— ११/१२/२०१८. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.